जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 7 MAY 2022
लोकमत

# दोन लाख विद्यार्थी देणार ऑफलाईन परीक्षा

## ७४ परीक्षा होणार : पेपर सोडविण्यास तासाला १५ मिनिटे जादा वेळ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने शिवाजी विद्यापीठाने उन्हाळी सत्रातील विविध ७४० परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील २ लाख २० हजार विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

पेपर सोडविण्यास एका तासाला १५ मिनिटे जादा वेळ परीक्षार्थींना दिला जाणार आहे. दि. १५ जुलैपर्यंत या परीक्षा पूर्ण करण्याचे नियोजन विद्यापीठाने केले आहे. या परीक्षांबाबतची माहिती प्रशासनाने उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांना शुक्रवारी दिली. यावेळी उच्च शिक्षण विभागाचे संचालक धनराज माने, कोल्हापूरचे विभागीय सहसंचालक हेमंत कठरे उपस्थित होते. या परीक्षार्थींना विद्यापीठ प्रश्नसंच पुरविणार आहे. दोन दिवसआड एक पेपर घेण्यात येईल.

### परीक्षा मंडळ संचालक पदासाठी ३ जूनला मुलाखती

कुलसचिव, परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालक नियुक्तीची प्रक्रिया लवकर पूर्ण करण्याची सूचना मंत्री सामंत यांनी केली. मंडळाच्या पूर्णवेळ संचालकपदाच्या नियुक्तीची प्रक्रिया सुरु आहे. त्यातील अर्जांची छाननी होऊन पात्र उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. मुलाखतीची प्रक्रिया दि. ३ जून रोजी होणार असल्याचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

0 7 MAY 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठात उपस्थित असलेल्या सर्वांनी मुख्य इमारतीसमोर असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ १०० सेकंद स्तब्ध राहून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना अभिवादन केले.

07 MAY 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहू विचारांच्या प्रसारासाठी दहा हजार गौरवगाथा क्रांती खंडाचे वाटप

## उदय सामंत : विद्यापीठांच्या निर्णयानुसार ऑफलाइन परीक्षा द्यावी

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर** : राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी पुढील वर्षभरात शाळा, महाविद्यालयांतील दहा हजार विद्यार्थी आणि ग्रामीण भागातील ग्रंथालयांना शासनातर्फे शाहू गौरवगाथा क्रांती खंडाचे वाटप केले जाणार आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी येथे पत्रकार परिषदेत दिली. राज्यातील सर्व विद्यापीठांच्या निर्णयानुसार विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षा द्याव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कृतज्ञता पर्वानिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी ते कोल्हापुरात आले असता, त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

शिवाजी विद्यापीठासह राज्यातील सर्व १३ विद्यापीठांच्या कुलगुरूंनी ऑफलाईन परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. शिवाजी विद्यापीठातील लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनासाठी मंजूर केलेल्या ३ कोटी रुपयांच्या निधीपैकी ३६ लाख ७५ हजार रुपयांचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला आहे. डॉ. ग. गो. जाधव अध्यासनाला मंजूर केलेले तीन कोटी रुपये येत्या दोन महिन्यांत दिले जातील. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. गजानन पळसे, आदी उपस्थित होते.

### कॉपी प्रकरणावरून नाहक त्रास दिल्यास चौकशी

खोटी कॉपी केस करून नाहक त्रास दिल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी पुराव्यासह केल्यास त्याची उच्च शिक्षण विभागाच्या संचालकांच्या माध्यमातून चौकशी करण्यात येईल, असे मंत्री सामंत यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना ऑनलाइन परीक्षेतील कॉपीकेसेसबाबत होत असलेल्या त्रासाचे वास्तव 'लोकमत'ने ३० एप्रिलच्या अंकात 'कॅमेऱ्याने ठरवले विद्यार्थ्यांना कॉपीखोर' या वृत्ताद्वारे मांडले होते.

### जूनपासून पुन्हा 'मंत्रालय आपल्या दारी'

विद्यापीठांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी 'मंत्रालय आपल्या दारी' उपक्रम जूनपासून राज्यात पुन्हा राबविण्यात येईल. राज्यातील शासकीय तंत्रनिकेतन, इंजिनिअरींग आणि फार्मसी कॉलेजच्या स्वच्छता, रंगरंगोटीसाठी प्रत्येकी १५ लाखांचा निधी दिला जाईल. पीएलए खात्यांतर्गत प्राचार्य, सहसंचालकांच्या खर्चाची मर्यादा वाढविली असल्याचे मंत्री सामंत यांनी सांगितले.

### इतर पक्षांचे आमदार, नगरसेवक शिवसेनेच्या संपर्कात

मनसेसह इतर पक्षांतील काही विद्यमान आणि माजी आमदार, नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते शिवसेनेत येण्यास उत्सुक आहेत. ते आमच्या संपर्कात आहेत. स्वत:चा टीआरपी वाढविण्यासाठी काहीजण महाविकास आघाडीतील नेत्यांवर टीका करतात. अशा टीका करणाऱ्यांना मी फार महत्त्व देत नाही. आगामी जिल्हा परिषद, महापालिका निवडणुकांबाबत आमचे पक्षप्रमुख जे आदेश देतील त्यानुसार कोल्हापूरमध्ये शिवसेना कार्यरत राहील, असे मंत्री सामंत यांनी सांगितले.

07 MAY 2022 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठांतील परीक्षांचा आढावा घेणार

## उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत : द्वितीय वर्षाच्या परीक्षा आठ दिवस पुढे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठाच्या ऑफलाईन ७४० परीक्षांसाठी २ लाख २० हजार विद्यार्थी बसणार आहेत. या परीक्षा जुलैपर्यंत पूर्ण होतील. द्वितीय वर्षाच्या परीक्षा आठ दिवस पुढे जातील. सर्व विद्यापीठात जाऊन परीक्षांचा आढावा घेणार आहे. राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मृती शताब्दी वर्षानिमित्त सीमा भागातील अभ्यास केंद्रात काजू प्रक्रिया, बटाटे, रताळे प्रोसेसिंग कोर्सेस यासह ड्रेस डिझाईन व ट्रॅव्हल व टुरिझम अभ्यासक्रम सुरू केले आहेत. भविष्यात स्वत:च्या जागेत याचे स्थलांतर केले जाईल, असे मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

शासकीयतंत्रनिकेतनमध्येज्वेलरी डिझाईनिंगचा डिप्लोमा सुरू करावा, अशी मागणी सराफ व्यावसायिकांनी केली होती. त्यानुसार हा अभ्यासक्रम यावर्षापासून सुरू करण्यात येणार आहे. राजाराम महाविद्यालय २.५० कोटी व पॉलिटेक्निक कॉलेजला ४.५० कोटी रुपये दुरुस्तीसाठी देण्यात येतील. प्राध्यापकांच्या २०८८ जागा संवर्गनिहाय भरल्या जाणार आहेत. ११७९ प्रयोगशाळा तंत्रज्ञ, ग्रंथपाल, शारीरिक शिक्षणचे संचालक भरण्याचा निर्णय घेतला असून याचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविल्याचे त्यांनी सांगितले.

**सीमाभागात जनजागृती करणार**

सीमा भागातील विद्यार्थी पदव्युतर शिक्षणासाठी शिवाजी विद्यापीठात आल्यावर त्यांना शैक्षणिक फी, वसतीगृह शुल्कात सवलत दिली जाईल. याबाबत कुलगुरूंसह सीमा भागात जाऊन याबाबतची माहिती देणार असल्याचे मंत्री सामंत म्हणाले.

### डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन केंद्रासाठी तीन कोटींचा निधी महिनाभरात

विद्यापीठातील पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन केंद्रासाठी तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून महिनाभरात दिला जाईल. त्याचबरोबर बाळासाहेब अध्यासनास तीन कोटी रुपयांची मान्यता दिली होती. त्यामधील ३६ लाख ७५ धनादेश कुलगुरूंकडे सुपूर्द केला असल्याचे मंत्री सामंत यांनी सांगितले.

0 7 MAY 2022
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दीनिमित्त कृतज्ञता पर्वामध्ये शुक्रवारी सकाळी १० वाजता १०० सेकंद स्तब्धता पाळून शहरासह जिल्ह्यात आदरांजली वाहण्यात आली. ■ शिवाजी विद्यापीठ

0 7 MAY 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात स्तब्धता पाळून श्रद्धांजली

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ परिवाराने सामूहिकरीत्या स्तब्धता पाळून या लोकराजाला अभिवादन केले. सकाळी १० वाजता सर्व विद्यापीठ परिवार या लोकराजाला अभिवादन करण्यासाठी स्तब्ध झाला. सर्वांनी मौनातून शाहूरायांना मनोमन श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, जी. आर. पळसे, अजित चौगुले, डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. नमिता खोत, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. डी. के. मोरे, डॉ. भारती पाटील, डॉ. डी. आर. मोरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमापूर्वी शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्यासह डॉ. व्ही. एन. शिंदे, जी. आर. पळसे, अजित चौगुले, डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. देविकाराणी पाटील, डॉ. नीलांबरी जगताप, अभय जायभाये आदी उपस्थित होते.

0 7 MAY 2022 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



सकाळ

# शाळा, महाविद्यालयांत शाहू गौरवगाथेचे वाटप

## मंत्री उदय सामंत; काही जण लवकरच सेनेत

कोल्हापूर, ता. ६ : शालेय जीवनातच राजर्षी शाहू महाराजांचे विचार विद्यार्थ्यांच्या मनात रूजवण्यासाठी व त्यांच्या विचाराचा प्रसार करण्यासाठी शाळा, महाविद्यालयातील दहा हजार विद्यार्थी व ग्रामीण भागातील ग्रंथालयांना शासनाच्यावतीने शाहू गौरवगाथा क्रांती खंडाचे वाटप केले जाईल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत दिली. श्री. सामंत यांनी आज विद्यापीठाला भेट देऊन तेथील कामकाजाचा आढावा घेतला. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. दरम्यान, मनसेसह इतर पक्षांतील काही विद्यमान आणि माजी आमदार, नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते शिवसेनेत येण्यास उत्सुक आहेत, असेही श्री. सामंत म्हणाले.

मंत्री सामंत म्हणाले, ''महाविकास आघाडीच्या नेत्यांवर काही जणांकडून होणारी टिका ही स्वत:चा टीआरपी वाढविण्यासाठी होत आहे. आगामी जिल्हा परिषद, महापालिका निवडणुकांबाबत आमचे पक्षप्रमुख जे आदेश देतील त्यानुसार कोल्हापूरमध्ये शिवसेना कार्यरत राहील.''

शिवाजी विद्यापीठासह राज्यातील सर्व १३ विद्यापीठांच्या कुलगुरूंनी ऑफलाईन परीक्षा घेण्याचा निर्णय घेतल्याचे सांगून श्री. सामंत म्हणाले, ''शिवाजी विद्यापीठातील लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनासाठी मंजूर केलेल्या ३ कोटीच्या निधीपैकी ३६ लाख ७५ हजार रुपयांचा धनादेश विद्यापीठाकडे सुपूर्द केला आहे. सीमा भागातील विद्यार्थ्यांसाठी शिनोळी येथील केंद्रात विविध अभ्यासक्रम सुरू केले आहेत. राजाराम महाविद्यालयाला दुरुस्तीसाठी दोन कोटी, तर शासकीय तंत्रनिकेतनला तीन कोटी रुपये देण्यात येतील.''

विद्यापीठांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी 'मंत्रालय आपल्या दारी' उपक्रम जूनपासून राज्यात पुन्हा राबविण्यात येईल. राज्यातील शासकीय तंत्रनिकेतन, इंजिनिअरींग आणि फार्मसी कॉलेजच्या स्वच्छता, रंगरंगोटीसाठी प्रत्येकी १५ लाखांचा निधी दिला जाईल, असे त्यांनी सांगितले.

यावेळी उच्च शिक्षण विभागाचे संचालक धनराज माने, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. गजानन पळसे आदी उपस्थित होते.

तरूण भारत

# विद्यापीठ परीक्षा ऑफलाईनच होणार

▪ उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांची माहिती



प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोनात लिखानाचा सराव कमी झाल्याने विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार पंधरा मिनिटे वाढवून दिली आहेत. तसेच एका प्रश्नाला दहा प्रश्न असा प्रश्न संच दिला, महाविद्यालये, वसतिगृह सुरू केली. त्यामुळे राज्यातील सर्व विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षेपासून सर्व परीक्षा ऑफलाईनच होणार आहेत, अशी माहिती शिवाजी विद्यापीठातील आयोजित पत्रकार परिषदेत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

विद्यापीठातील परीक्षांची आढावा बैठकीनंतर पत्रकार परिषदेच्या माध्यमातून त्यांनी संवाद साधला. ते म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने उन्हाळी परीक्षा ऑफलाईन घेण्याची तयारी केली आहे, प्रश्न संच तयार केला आहे. एका पेपरमध्ये दोन दिवसाचे अंतर ठेवले आहे. औद्योगिक क्षेत्रात ऑनलाईन परीक्षा देणाऱ्यांना नोकरीला घेताना अडचणी येणार आहेत, असा अहवाल आहे. तरी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षेचा हट्ट सोडावा, असे आवाहन विद्यार्थ्यांना मंत्री सामंत यांनी केले आहे. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, विभागीय सहाय्यक संचालक डॉ. हेमंत कटरे, प्रभारी कुलसचिव डॉ. शिंदे, परीक्षा व मूल्यमापनचे संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगले होते.

## सीमा भागातील विद्यार्थ्यांना विद्यापीठातील प्रवेशफीत सूट

चंदगड तालुक्यात शिनोळीत विद्यापीठाचे अभ्यास केंद्र सुरू केले आहे. येथे काजू प्रक्रिया, बटाटा, रताळे प्रोसेसिंग, ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम आदी अभ्यासक्रम सुरू केले आहेत. ते विद्यार्थी पदव्युत्तरचे शिक्षण घेण्यासाठी विद्यापीठात आले तर त्यांना शैक्षणिक प्रवेश फी व वसतिगृह प्रवेश फीमध्ये सूट दिली जाणार आहे.

## अध्यासन केंद्रांना ३ कोटीपैकी ३६ लाख ७५ हजार कुलगुरुंकडे सुपुर्द

शिवाजी विद्यापीठातील अध्यासन केंद्रांना राज्य सरकारने ३ कोटी रुपये अनुदान मंजूर केले आहे. त्यापैकी ३६ लाख ७५ हजार रुपये कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपुर्द केले आहेत. त्यामुळे अध्यासनाला गती येईल. १५ लाख रुपये इमारतींच्या स्वच्छता व सोयीसुविधांसाठी देत आहोत. मंत्रालय आपल्या दारी उपक्रमातून राज्यातील ३७५ लोकांना अनुकंपाखाली नोकरी दिली.

### तंत्रनिकेतनमध्ये 'जेम्स ॲण्ड ज्वेलरी'

कारागीरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासकीय तंत्रनिकेतनमध्ये जेम्स ॲन्ड ज्वेलरी अभ्यासक्रम सुरू होणार आहे.

### राजाराम कॉलेज व पॉलिटेक्निकला अनुदान

राजाराम कॉलेजला अडीच कोटी व शासकीय तंत्रनिकेतला साडेचार कोटीचे अनुदान तसेच इंजिनिअरिग कॉलेज, फार्मसी, पॉलिटेक्निक आदी कॉलेजला १५ लाख देणार असल्याचे सांगितले.

तरूण भारत

# १३ विद्यापीठात चित्र प्रदर्शन भरवणार : मंत्री उदय सामंत



राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मृती शतब्दी वर्षानिमित्त राज्यातील १३ विद्यापीठांमध्ये त्यांच्या कार्याची माहिती होणारे चित्रप्रदर्शन भरविली जाणार आहे. तसेच १० हजार विद्यार्थ्यांना शाहूंचा गौरव ग्रंथ देणार असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली. नवीन पिढीला शाहूंचा विचार पोहोचविणे हा यामागील उद्देश असल्याचेही त्यांनी सांगितले. ते म्हणाले, शाहूंनी प्राथमिक शिक्षण प्रत्येकाला मिळण्यासाठी सक्ती केली. ज्यांची मुले शाळेला येणार नाहीत त्यांच्या पालकांना दंड सुरू केला. शासनाकडून जे कायदा केले त्यामध्ये शाहूंच्या विचारांचे प्रतिबिंब आहेत. लोकराजा शाहूंसाठी लाखो लोकांनी शुक्रवारी स्तब्ध राहून अभिवादन केले. देशात प्रथमच असे घडले आहे. कला, सांस्कृतिक कार्यक्रमांना राजाश्रय दिला. महाविकास आघाडी सरकार त्यांच्या आदर्शनेच कामकाज करेल.

07 MAY 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# शिक्षणातील क्रांतीकारकाला विद्यापीठाचा सलाम...!

कोल्हापूर : बहुजन समाजाला शिक्षणाचे व्दार खुले करून शैक्षणिक क्रांती घडविणाऱ्या लोकराजा राजर्षी शाहू महाराजांना शिवाजी विद्यापीठाच्यावतीने शंभर सेकंद स्तब्धता पाळून मानवंदना देण्यात आली. यावेळी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह विविध अधिविभागाचे प्रमुख, प्राध्यापक, प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.